# त्रिवेणी

**ना. सी. फडके**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**त्रिवेणी : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २४०/-

# त्रिवेणी

# जयंत

## १

घंटा खणखणून वाजलेली ऐकू आली म्हणून मी डोळे उघडले. अंथरुणावरून उठलो नाही. अंगावरची चादरही दूर केली नाही. परंतु घंटा पुन्हा वाजते की काय म्हणून कानोसा घेऊ लागलो.

बराच वेळ झाला तरी घंटा पुन्हा वाजली नाही.

खिडकीतून बाहेर नजर टाकली. अंधार दिसला. आकाशाच्या चौकटीत फ्रेम करून ठेवल्यासारखा चमचमणाऱ्या तारकांचा पुंज दिसला.... पहाटेचा प्रहर असल्याबद्दल आणखी पुरावा देणारी पहाटवाऱ्याची गार झुळुक खिडकीतून आली.

मग माझ्या लक्षात आलं की उजाडलं नव्हतं. माझ्याकडे आलेल्या कुणी माणसानं घंटा वाजविलेली नव्हती... घंटा वाजलीच नव्हती. ती वाजल्याचा मला केवळ भास झाला होता.... माझ्या जागेतल्या घंटेचा हा आवाज नव्हताच. अगदी निराळा होता. अकरा-बारा वर्षांपूर्वी माझ्या बिऱ्हाडातली घंटा असा आवाज करीत असे. इतकी वर्षं होऊन गेली तरी त्या घंटेच्या आवाजाची मला स्पष्ट आठवण होती. तोच आवाज ऐकल्याचा भास मला होता खास. हा भास होण्यापूर्वी मला स्वप्न पडलं होतं की काय कुणास ठाऊक. पडलं असावं. बहुधा त्या स्वप्नात मी दोन वर्षांच्या छोट्या त्रिवेणीला उचलून कडेवर घेतली असावी, तिला उंच केली असावी, आणि तिनं आपला नाजूक मऊ मऊ गोरा तळहात घंटेच्या बटणावर दाबला असावा. अकरा-बारा वर्षांपूर्वी परिचित असलेला घंटेचा आवाज ऐकल्याचा भास मला झाला असावा....

त्रिवेणीची आठवण मला आजच का व्हावी याला खरं म्हणजे काहीच कारण नव्हतं. तिच्याविषयी कधी नव्हे ते आजच मला स्वप्न का पडावं याला काही कारण नव्हतं. माझं ते पूर्वायुष्य मी आता इतक्या पूर्णतेनं विसरून गेलो होतो की जणू त्या वेळचा जयंत माझ्या ठिकाणी आता उरला नव्हताच. तो जयंत निराळाच होतो. आजचा मी वेगळाच होतो. त्या काळातल्या सुख:खांच्या आठवणी माझ्या मनात आता नव्हत्या. निदान जागेपणीच्या व्यवहारी मनात तरी नव्हत्याच. अंतर्मनाच्या खोल कप्प्यात कुठे असल्या तर असतील. छोट्या त्रिवेणीचं स्वप्न मला आज पडावं हा एक चमत्कारच होता. त्याची संगती लागण्यासारखी नव्हती. पण स्वप्नसृष्टीतल्या साऱ्याच हालचाली अशा चमत्काराच्या नसतात. अंतर्मनात दडलेली एखादी गुप्त आठवण केवळ लहरीनं चाळविली जाते, मनाच्या पृष्ठभागावर येते, झोपेतल्या स्वप्नाच्या रूपानं प्रगट होते.... असंच काही तरी झालं असावं, आणि घंटेचा तो आवाज ऐकल्याचा भास मला झाला असावा.....

छोट्या त्रिवेणीच्या अनेक गोड हट्टांपैकी तो एक ठरीव हट्ट होता.... ''पपा, मला घंटा वाजवायची आहे'' असं माझ्या पायांना मिठी घालून तिनं म्हणावं. मी बाहेर जाण्याचा कितीही घाईत असलो तरी तिला उचलून घ्यावं, उंच धरावं, तिनं घंटेचं बटन दाबावं, घंटा वाजली की टाळ्या वाजवून हसावं, ''आणखी एकदा'' असं म्हणावं, आणि कितीदाही घंटा वाजविली तरी तिचं समाधान होऊ नये. ''अग, आता पुरे की'' असं मी कितीदाही म्हटलं तरी ''आणखी एकदा, मग नाही म्हणणार. शप्पथ !'' हे तिचं पालुपद चालूच राहावं....तिची एक चमत्कारिक इच्छा अशी असे की दाराबाहेर घंटेचं बटन दाबणं आणि आतल्या बाजूस घंटा वाजताना विद्युतप्रकाशाच्या बारीक ठिणग्या दिसतात त्या पाहणं या दोन्ही गोष्टी करता याव्यात. हे केवळ अशक्य आहे असं कितीही समजून सांगितलं तरी तिला पटत नसे. 'का ?' 'का ?' असं ती विचारीत राही. बटन दाबून घंटा वाजविण्याचा तिच्या आनंदात उणेपणा राहत असे.....

पूर्वायुष्यातली आठवण आजच मला का व्हावी असा मनाशी चमत्कार करीत मी काही वेळ पडून राहिलो.... उजाडलं नव्हतं. उठण्यात काही अर्थ नव्हता. पुन्हा झोपण्याचा प्रयत्न केला, परंतु एकदा चाळविली गेलेली झोप पुन्हा लागेना... चमचमणाऱ्या तारकापुंजाकडे बघत राहिलो. हे कोणतं नक्षत्र असावं या प्रश्नाचं



उत्तर शोधू लागलो. पण लवकरच लक्षात आलं की खगोलशास्त्राचं माझं ज्ञान यथातथाच होतं. आणि जे नक्षत्र दिसत होतं त्याच्या नावावाचून काय अडलं होतं ? त्याची शोभा नावावर अवलंबून नव्हती. लकलकणाऱ्या त्या तारकांकडे मी पाहत राहिलो. पहाटवाऱ्याचा सुखकारक स्पर्श घेत राहिलो..... हळूहळू पूर्वायुष्यातल्या आठवणींची ऊर्मी विरून गेली. आदल्या रात्री घडलेल्या गोष्टी आठवू लागल्या...

सतारवादनाची ती मैफल आटपली तेव्हा एक वाजला होता. अरुणाला तिच्या घरी सोडलं तेव्हा तिनं विचारलं होतं, ''कॉफी घेणार का थोडी ? वर येणार का ?'' मी म्हटलं होतं, ''नको, आता तर फार उशीर झाला आहे.'' खरं म्हणजे मला कॉफी हवी होती. परंतु अरुणाकडे जावं, बसावं असं वाटत नव्हतं. स्वत:चीच भीती वाटत होती. मन आवरता येईल अशी खात्री वाटत नव्हती. वर चलण्याचा आग्रह तिनं पुन्हा केला. परंतु मी निश्चयानं नकार दिला होता आणि घरी आलो होतो. अरुणाच्या सहवासात घालविलेल्या चार घटकांनी विलक्षण सुखावलो होतो. अंथरूणावर अंग टाकल्याबरोबर गाढ झोपेच्या कुशीत शिरलो होतो......

अरुणाची आणि माझी पहिली भेट झाली त्या गोष्टीला किती वर्षं झाली बरं......पाच वर्ष होऊन गेली खास. हो ! कारण ही गोष्टी मला पक्की आठवते की अरुणा मल प्रथम भेटली तेव्हा मी थोडा आजारी होतो.

पाच वर्षांच्या त्रिवेणीला घेऊन सुमित्रा मला सोडून निघून गेली तेव्हा तिच्या जाण्याला मी विरोध केला नव्हता. विभक्त होण्याची कल्पना सुमित्रानं माझ्याजवळ जेव्हा जेव्हा बोलून दाखविली होती तेव्हा तेव्हा मी तिला येवढंच म्हणालो होतो, ''घाई नको. काही दिवस वाट बघू या . एकत्र राहणं अशक्यच वाटलं तर मग काय ते ठरवू या.'' सुमित्राही ''बरं'' म्हणत असे. परंतु अखेर जेव्हा आपलं प्रेम दूसऱ्यावर बसलेलं असल्याचं तिनं मला स्पष्टच सांगितलं तेव्हा मलाही उमज पडला की आता माझ्याजवळ राहण्याचा तिला आग्रह करण्यात अर्थ नव्हता. तिच्या प्रेमकरणाचा संशय मला बरेच दिवस होता, परंतु माझा संशय खोटा ठरेल अशी आशा मी बाळगली होती. माझा आणि सुमित्राचा प्रीतिविवाह झालेला होता. आम्ही दोघं एकमेकांच्या प्रेमात पडलो होतो तेव्हा अगदी भलतीच पडलो होतो. एकमेकांवाचून जगणं केवळ अशक्य आहे अशी आमची दोघांची खात्री झाली होती, आणि म्हणूनच लग्न करून आम्ही संसार थाटला होता. आमच्या त्या प्रीतीचा रंग त्या वेळेस इतका गडद होता

की तो कधी फिका होईल अशी पुसटदेखील शंका आम्हाला आली नव्हती. परंतु तसं घडलं होतं, आणि घडल्यानंतर ते घडलंच नाही  असं सोंग करण्यात अर्थ नव्हता. सुमित्राला स्वातंत्र्य हवं होतं. दूसऱ्याच्या प्रेमात ती सापडली होती. त्याच्या श्रीमंतीला ती भुलली होती असं मला वाटत होतं. परंतु माझी शंका चुकीची असेलही. तिचं दुसऱ्या माणसावर खरोखरीचं प्रेम बसलं असेलही. तिला माझ्यापासून दूर व्हायचं होतं. तिच्या आड येण्याची माझी इच्छा नव्हती. पाच वर्षांच्या त्रिवेणीचा सांभाळ करणं मला शक्य नव्हतं. ''मी त्रिवेणीला नेणार आहे.'' असं सुमित्रा म्हणाली. मी संमती दिली. हे सारं करताना मी निर्विकार राहिलो. दू:ख झाल्यासारखं दाखविलं नाही. दु:ख होईलसं वाटलंच नाही....परंतु अंतर्यामी कुठेतरी गाढ दू:ख झालं असलं पाहिजे. कारण सुमित्रा त्रिवेणीला घेऊन गेल्यानंतर पुरते दोन आठवडे झाले नाहीत तोच मी चांगलाच आजारी पडलो....

दूसरं महायुद्ध संपण्याच्या सुमारास मी स्वदेशी परत आलो होतो. आघाडीवर भेटलेली सुमित्रा मला पुन्हा भेटली होती. तिचं प्रियाराधन करण्यात मी इतर साऱ्या गोष्टी विसरून गेलो होतो. परंतु त्याच सुमारास आघाडीवर असताना जे अनुभव आले होते ते सहज लिहून पाहावेत म्हणून मी एक कादंबरी लिहिली होती. एका प्रकाशकानं  ती प्रसिद्ध केली होती. गाजली होती. आणखी दोन कादंबऱ्या मी लिहिल्या होत्या. त्यांचाही चांगलाच बोलबोला झाला होता....परंतु सुमित्रा मला सोडून गेल्यानंतर माझ्या मनाची अशी काही विचित्र मोडतोड झाली की माझं लेखन अजिबात बंद पडलं. सुसंगत विचार म्हणून मला करता येईना. कल्पनाशक्ती तर संपल्यासारखीच झाली. सुमित्राचा ताटातुटीचं दू:ख मोठंसं वाटत नव्हतं, परंतु त्रिवेणीची पदोपदी आठवण होत होती, आणि ती झाली की अंत:करणात कुठेतरी मोठीच पोकळी निर्माण झाल्याप्रमाणे जीव घाबरा होत होता.......पाच वर्षांच्या आजारीपणानंतर माझी अवस्था इतकी चिंताजनक झाली की डॉक्टरांनी मला आपल्या नर्सिंग होममध्ये नेऊन ठेवलं होतं......

अरुणाची आणि माझी पहिली भेट झाली ती या नर्सिंग होममध्येच.

आधी दोन दिवस तिचं पत्र आलं होतं. पत्राखालची अरुणा शेवडे ही सही पाहून मी मनाशी म्हटलं होतं, कोण ही ? या नावाची कुणी स्त्री माझ्या परिचयाची नव्हती. 'आपला आणि माझा परिचय नाही' असं तिनंही पत्राच्या आरंभी लिहिलं



होतं. मी आजारी असून सध्या नर्सिंग होममध्येच आहे ही माहिती तिनं कुणाजवळून कशी मिळविली होती कोण जाणे, पण तिनं लिहिलं होतं, 'गाठीभेट घेण्याइतपत, आलेल्या माणसाशी बोलण्याइतपत आपली प्रकृती सुधारली आहे याबद्दल डॉक्टरांकडून खात्री करून घेतल्यावरच हे पत्र लिहीत आहे.' तिचं माझ्याकडे काही काम होतं.  कोणत्या दिवशी किती वाजता आलं असता चालेल ते तिनं विचारलं होतं.

ती प्रत्यक्ष आली तेव्हा मात्र तिचं पत्र आल्याची आणि मी तिच्या पत्राला उत्तर धाडल्याची गोष्ट मी विसरून गेलो. नोकरानं जेव्हा मला सांगितलं, ''बाहेर कुणी बाई आपल्याला भेटायसाठी आल्या आहेत'' तेव्हा ''कोण ?'' असा आश्चर्याचा उद्‌गार माझ्या तोंडून बाहेर पडला, आणि त्यानं दिलेल्या व्हिजिटिंग कार्डकडे मी काहीशा उत्सुकतेनंच पाहिलं.

तिनं आपल्याबरोबर लांब लांब देठांचे सुंदर पिवळ्या रंगाचे गुलाबाचे गेंद आणले होते. तिच्या नमस्काराला उलट नमस्कार करून मी तिला 'बसा' म्हटलं तेव्हा आधी तिनं इकडे इकडे बघितलं, खिडकीच्या कट्ट्यावर एक काचेचा 'जग' दिसला तेव्हा ''घेऊ का ?'' असं हसत विचारलं, त्यात पाणी भरलं, गुलाबाची फुलं ठेवली, आणि मग समोरच्या खुर्चीवर बसताना तिनं पुन्हा नमस्कार केला.

''माझ्या भेटीनं त्रास नाही ना होणार ?'' तिनं विचारलं.

''छे छे ! त्रास कसला ? माझी प्रकृती आता पुष्कळ बरी आहे.''

काही वेळ माझी नजर चुकवून ती स्तब्ध राहिली. ''काय काम आहे ?'' असं तिला विचारावं की काय म्हणून विचार होतो इतक्यात तिनं खिडकीकडे लावलेली नजर वळविली, माझ्याकडे बघितलं, आणि हळूच म्हटलं, ''थोडं काम आहे. पत्रात लिहिण्यासारखं नाही म्हणून म्हटलं समक्ष भेट घ्यावी.''

मी काही बोललो नाही, परंतु  ''सांगा काय काम आहे ते'' अशा अर्थाचं हास्य केलं.

''आपली नवी कादंबरी प्रकाशनासाठी मिळेल का ?'' असा प्रश्न तिनं केला, आणि या प्रश्नाचा अधिक खुलासा करायला हवा असं लगेच लक्षात आल्याप्रमाणे ती म्हणाली, ''प्रकाशनसंस्था काढण्याचा विचार करते आहे, आणि मनानं ठरविलं आहे की पहिलं पुस्तक आपलं काढायचं. आपल्या कादंबऱ्यांची मी फार चाहती

आहे. खरं म्हणजे हे सांगण्याची गरज नाही. कारण आपल्या कादंबऱ्या आवडत नाहीत कुणाला ! पण आपलं सांगितलं. कितीतरी दिवस मनाशी ठरविलं आहे की, आपली कादंबरी मिळवायची आणि नव्या उद्योगाचा मुहूर्त करावयाचा. ''

मी काही न बोलता तिच्याकडे पाहत राहिलो तेव्हा मला तिची आणखी माहिती हवी होती असा तिनं तर्क केला असावा. कारण ती स्वत:विषयी आणखी गोष्टी सांगत राहिली.

जनरल पोस्ट ऑफिसमध्ये सुभाष शेवडे नावाचे एक अधिकारी होते, त्यांची ती बायको. हे गृहस्थ मोठे साहित्यप्रेमी होते. मुंबईच्या साहित्यसंघाचे उत्साही कार्यकते होते. (''त्यांचाविषयी मी पुष्कळ ऐकलं आहे.'' मी म्हटलं.) आपणही काही साहित्यविषयक उद्योग करावा अशी अरुणाची फार दिवसांची इच्छा होती. मासिक काढण्याचे बेत तिनं केले होते, परंतु सुभाषनं त्या बाबतीत तिला उत्तेजन दिलं नव्हतं. ''इतकी नवी मासिकं निघतात आणि बुडतात. त्यात तुझ्या मासिकाची आणखी भर कशाला?''असं त्याने विचारलं होतं. तिनं हट्टच केला असता तर सुभाष तिच्या आड आला नसता. परंतु अधिक विचाराअंती तिनंच तो बेत सोडून दिला होता. मग प्रकाशन संस्थेची कल्पना निघाली होती, आणि सुभाषनं म्हटलं होतं, ''पहिल्या प्रकाशनासाठी जयंत आपट्यांची कादंबरी मिळविणार असशील तर काढ प्रकाशसंस्था...''

''ज्याला ज्याला प्रकाशनसंस्थेची कल्पना सांगितली'' ती म्हणाली, ''त्यानं त्यानं हाच सल्ला दिला. आपली भेट कुणामार्फत घ्यावी याचा काही दिवस विचार केला. मग शेवटी ठरविलं की करायचा आहे काय मध्यस्थ ? आपण सरळ भेट घ्यावी आणि विचारावं'' तिनं सरळ माझ्याकडे बघितलं आणि विचारलं, ''काही चुकलं नाही ना माझं ?''

''खरं सांगायचं म्हणजे चुकलं आहे.''

तिची चर्या चपापल्यासारखी झाली. ''म्हणजे माझी विनंती मान्य होण्यासारखी नाही ? आपली कादंबरी मिळविण्याची माझी इच्छा पूर्ण होण्यासारखी नाही ?'' मी मान हलविली तेव्हा ती म्हणाली, ''देण्या-घेण्याच्या आपल्या ज्या काही अटी असतील त्या आपण सांगण्यापूर्वीच मी मान्य करते. मग तर काही अडचण नाही ना?''



''एक मोठीच अडचण आहे.''

''कोणती ?''

''माझं लिहिणं संपलं असं मला वाटायला लागलं आहे-''

ती एकदम म्हणाली , ''ह्यॅ: ! काही तरीच.''

''खोटं नाही. यापुढे माझ्या हातून कादंबरीलेखन होईल असं मला वाटत नाही. डॉक्टर म्हणतात की माझी तब्येत पुष्कळ सुधारली आहे, आणि आणखीही सुधारेल. त्यांचं म्हणणं बरोबर असेलही. परंतु तब्येत सुधारेल म्हणजे काय, शरीरानं मी धट्टाकट्टा राहीन, खाणं-पिणं, झोप सगळं काही व्यवस्थित करू शकेन, पुष्कळ वर्षं जगेन. पण माझ्या मनाचं आरोग्य पुन्हा परत मिळेल असं नाही वाटत मला. माझी कल्पनाशक्ती मी कायमची गमावून बसलो असं मला वाटतं. काही लिहिण्याचा उत्साह कसा तो शिल्लक राहिलेला नाही-''

मला थांबविल्यासारखा अभिनय करून अरुणा मध्येच म्हणाली, ''छे छे ! आपल्या तोंडचं असलं काही बोलणं मी ऐकणार नाही. ऐकवतच नाही. आपलं लिहिणं संपलं ? छे ! काहीतरीच. कोण विश्वास ठेवील यावर ?''

तिनं माझ्याकडे अगदी टक लावून बघितलं. तिची विनंती अमान्य करण्यासाठी मी काहीतरी खोटं सांगत होतो अशी शंका तिला आली असावी असं तिच्या नजरेवरून मला वाटलं. मी म्हटलं, ''कुणाचा विश्वास बसो न बसो, मी जे सांगितलं ते खरं आहे. काही सुचतच नाही. एखाद्या दमलेल्या घोड्यासारखी झाली आहे माझ्या कल्पनाशक्तीची अवस्था. तिला उगीच फटके मारण्यात काय अर्थ आहे? बैठकच मारली आहे तिनं. उठून पुढे पाऊल टाकायला तयारच नाही ती.''

''चमत्कारच आहे म्हणायचा'' असा उद्गार काढताना अरुणाच्या स्वरात आणि डोळ्यांच्या नजरेतही सहानुभूतीचं पाणी चमकलं.

ते पाहून क्षणमात्र मला वाटलं, ज्या गोष्टींच्या धक्क्यामुळे माझ्या मनाची मोडतोड झाली होती त्या तिला सांगितल्या तर तिचं आश्चर्य दूर होईल....परंतु लगेच मनात आलं, जिचा माझा प्रथमच परिचय होत होता तिला माझं दु:ख सांगणं वेडेपणाचं ठरेल. माझ्या मनाच्या छिन्नभिन्न अवस्थेला जे कारण होतं ते मला ठाऊक होतं ही अवस्था अकारण निर्माण झाली असं मला वाटत नव्हतं. अर्थात तिचा मला खेद होत होता, परंतु विस्मय वाटत नव्हता. अरुणाचं आश्चर्य दूर करणं मला शक्य